**परिपत्रक नं. <u>35</u>**
**(जनरल विभाग)**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
**दि. 07/09/2018**

**सर्व शाखाप्रमुख,**
**रयत शिक्षण संस्था,**

यांना . . . . . .

**विषय - 22 सप्टेंबर कर्मवीर जयंती व रयत शताब्दी महोत्सव 4 ऑक्टोबर ते 11 आक्टोबर साजरा करणेसंदर्भात मार्गदर्शक सूचना**

कर्मवीर जयंती सोहळा प्रत्येक शाखेमध्ये कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची महती विद्यार्थी व समाजापर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने उत्साहाने साजरा केला जातो. 22 सप्टेंबरच्या कार्यक्रमाचे आयोजन सप्ताह म्हणून केले जाते. या शैक्षणिक वर्षामध्ये संस्थेच्या शताब्दी महोत्सवाचे औचित्य साधून 4 ऑक्टोबर ते 11 ऑक्टोबर 2018 या कालावधीमध्ये वर्धापन दिनानिमित्त विविध शैक्षणिक कार्यक्रम घेण्याचे निश्चित झाले आहे. त्यासंदर्भामधील मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे ---

- कर्मवीर जयंतीचा कार्यक्रम दि.22/9/2018 रोजी अण्णांच्या प्रतिमेची मिरवणूक काढून साजरा करावा.
- संस्थेच्या शताब्दी महोत्सवाच्या उदघाटन सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम 4 ऑक्टोबर 2018 रोजी संस्थेच्या समाधी परिसरात संपन्न होत असून त्यास संस्थेचे सर्व जनरल बॉडी सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, कार्यकर्ते, हितचिंतक उपस्थित राहणार असलेमुळे शाखांचे कार्यक्रम 5 ऑक्टोबर ते 11 ऑक्टोबर,2018 या कालावधित घ्यावेत.
- शताब्दी वर्षानिमित्त 5 ऑक्टोबर 2018 ते 11 ऑक्टोबर 2018 हा कालावधी शताब्दी सप्ताह म्हणून साजरा करावा, त्यामध्ये प्रत्येक शाखेने खालीलप्रमाणे उपक्रम घ्यावेत.

1. **शताब्दी फलकाचे अनावरण करणे. शाखांच्या नावाचे फलक उपलब्धतेनुसार संस्थेमार्फत पुरविले जाणार आहेत.**
2. चित्ररथाच्या माध्यमातून मिरवणूक काढणे. (सदर चित्ररथासाठी लागणारे फलक संस्थेमार्फत नमुने पुरविले जाणार आहेत.)

. . . 2 /..

3. शाखेमध्ये व्याख्यानमाला आयोजित करणे.(गेस्ट लेक्चर)
4. 5 ऑक्टोबर 2018 रोजी माजी विद्यार्थी, देणगीदार, संस्था हितचिंतक, स्कूल कमिटी सदस्य, जनरल बॉडी सदस्य इत्यादींचा संयुक्त मेळावा आयोजित करणे. त्यामध्ये स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचा सत्कार घेणे.
5. रयत शिक्षण संस्था काल, आज आणि उद्या व कर्मवीर अण्णांच्या जीवनावरील माहितीपट दाखविणे. (संस्थेमार्फत सी.डी. पुरविली जाणार आहे.)
6. विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करणे.
7. वक्तृत्व, निबंध, चित्रकला, रांगोळी, क्रीडा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे.
8. शताब्दी प्रकल्पांचा प्रारंभ (उदा. इमारत बांधकाम, शेतीप्रकल्प, क्रीडाप्रबोधिनी, मिनीसायन्स सेंटर, अटल टिंकरिंग लॅब इत्यादींचे भूमीपूजन किंवा उदघाटन करुन करावा.)

शताब्दी सप्ताहामध्ये 5 ते 11 ऑक्टोंबर या कालावधीत सलग कार्यक्रमांचे आयोजन करुन शताब्दी वर्षाची वातावरण निर्मिती करावी. शताब्दी सप्ताहामध्ये सर्व शाखांमधील कार्यक्रमामध्ये एक वाक्यता असावी म्हणून सदर परिपत्रकाद्वारे आपणास वरीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत. शताब्दी सप्ताह झाल्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय कार्यालयाकडे पाठवून द्यावा.

शताब्दी सप्ताहाच्या नियोजनामुळे दरवर्षीप्रमाणे कर्मवीर जयंती सप्ताहात आपण जे कार्यक्रम आयोजित करीत होतो ते दि.5/10/2018 ते 11/10/2018 या कालावधित आयोजित करावेत.

रयत शिक्षण संस्था सातारा

सचिव,
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

प्रत माहितीसाठी रवाना -
1. मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
2. मा.सर्व विभागीय चेअरमन, विभागीय सल्लागार मंडळ, रयत शिक्षण संस्था,
3. सहसचिव (माध्य./उच्च शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
4. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा
5. सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था,